लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.),
मुंबई यांस सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता
व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक -एलएएस २०११/प्र.क्र.१७४/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ६ मे, २०११

वाचा :- १) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्रमांक :लेखानु-२०.११/प्र.क्र.६५/
अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०११.

**शासन निर्णय** :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.१५.३८ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.३७१.१८ लाख अशी एकूण रु.३८६.५६ लाख एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पिय तरतूदीपैकी १ एप्रिल, २०११ ते ३१ मे, २०११ या कालावधीकरीता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.२.५६ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.६१.८६ लाख असे एकूण रु.६४.४२ लाख (अक्षरी रुपये चौसष्टलाख बेचाळीस हजार फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान शासन खालील अटींवर मंजूर करीत आहे:-

अ) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
ब) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
क) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
ड) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
ई) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

२. वरील अनुदानाबाबत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस त्वरित संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. त्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

GR. Sathe

Scanned with CamScanner

३. या बाबींवर होणारा खर्च २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०१,अनुसूचित जातीचे कल्याण - ८०० इतर खर्च, (१०) (००) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. यांस सहाय्यक अनुदान (२२२५ २३१ ७) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) याकरिता रु. २.५६ लाख आणि ३६ सहायक अनुदान (वेतन) याकरीता रु. ६१.८६ लाख, मागणी क्रमांक एन-३ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून मासिक निधी विवरणपत्राच्या मर्यादेत भागविण्यात यावा.

४. हा शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : लेखानु- २०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०११ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कि. पां. वडते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साटे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई ३२.
अवर सचिव, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
निवड नस्ती का-विघयो-२.

GR. Sathe

Scanned with CamScanner

2011-12

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई यांस सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक -एलएएस २०११/प्र.क्र.१७४/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ जुलै, २०११

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :लेखानु-२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०११.
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांक :अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/ अर्थसंकल्प-३, दिनांक ६ मे, २०११.
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :- एलएएस २०११/प्र.क्र.१७४/विघयो-२, दिनांक :- ६ मे, २०११

शासन निर्णय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.१५.३८ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.३७१.१८ लाख अशी एकूण रु.३८६.५६ लाख एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक ६.५.२०११ अन्वये माहे एप्रिल २०११ ते डिसेंबर २०११ या नऊ महिन्यांसाठी एकूण अर्थसंकल्पिय तरतूदीच्या ७५% इतकी तरतूद वितरित करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई या महामंडळासाठी ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.११.५३५ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.२७८.३८५ लाख इतकी तरतूद उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सदर तरतूदीपैकी माहे एप्रिल व मे २०११ या दोन महिन्यासाठी ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु. २.५६ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु. ६१.८६ लाख इतकी तरतूद अ.क्र. ३ वरील दिनांक ६.५.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करुन वितरित केली आहे. आता उर्वरित तरतूद दिनांक १ जून, २०११ ते ३१ डिसेंबर, २०११ या कालावधीकरीता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.८.९६ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.२१६.५१ लाख असे एकूण रु.२२५.४७ लाख (अक्षरी रुपये दोन कोटी पंचवीस लाख सत्तेचाळीस हजार फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान शासन पुढील अटींवर मंजूर करीत आहे:-

अ) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

ब) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.



Scanned with CamScanner

क) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

ड) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.

ई) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

२. वरील अनुदानाबाबत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस त्वरित संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. त्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या बाबींवर होणारा खर्च २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०१,अनुसूचित जातीचे कल्याण - ८०० इतर खर्च, (१०) (००) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. यांस सहाय्यक अनुदान (२२२५ २३१ ७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) याकरिता रु. ८.९६ लाख आणि ३६ सहायक अनुदान (वेतन) याकरीता रु. २१६.५१ लाख, मागणी क्रमांक एन-३ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून मासिक निधी विवरणपत्र मर्यादेत भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने तसेच त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १८६/व्यय-१४ व २३५/ अर्थ-७, दिनांक ११ जुलै, २०११ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कि. पां. वडते )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई ३२.
अवर सचिव, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
निवड नस्ती का-विघयो-२.

GR. Sathe

Scanned with CamScanner

2011-12

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.), मुंबई यांस सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक -संकिर्ण २०१२/प्र.क्र.३५/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० मार्च, २०१२

वाचा :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक :लेखानु-२०.११/प्र.क्र.६५/अर्थसंकल्प-३, दिनांक ३१ मार्च, २०११.
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग, क्रमांक :अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/ अर्थसंकल्प-३, दिनांक ६ मे, २०११.
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :- एलएएस २०११/प्र.क्र.१७४/विघयो-२, दिनांक :- ६ मे, २०११
४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :- एलएएस २०११/प्र.क्र.१७४/विघयो-२, दिनांक :- १६ जुलै, २०११
५) शासन निर्णय ,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :संकिर्ण -२०१२/प्र.क्र.३५/महामंडळे, दिनांक १३ मार्च, २०१२

शासन निर्णय :- उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक-५ येथील शासन निर्णय रद्द करण्यात येत असुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश शासन देत आहेत :-

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. मुंबई मार्फत मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरिता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.१५.३८ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.३७१.१८ लाख अशी एकूण रु.३८६.५६ लाख एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.

२. वाचा अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये माहे १ एप्रिल,२०११ ते ३१ मे,२०११ या कालावधीकरीता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.२.५६ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.६१.८६ लाख अशी एकूण रु.६४.४२ लाख (रुपये चौसष्ट लाख बेचाळीस हजार फक्त) तसेच, वाचा अ.क्र.४ येथील शासन निर्णयान्वये, दिनांक १जून,२०११ ते ३१ डिसेंबर, २०११ या कालावधीकरीता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.८.९६ लाख आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.२१६.५१ लाख अशी एकूण रु.२२५.४७ लाख(रु. दोन कोटी पंचवीस लाख सत्तेचाळीस हजार फक्त) व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

३. सन २०११-२०१२ मधील एकूण अर्थसंकल्पीय वेतनेतर तरतूदीपैकी ९०% एवढी रक्कम वितरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार राहीलेली तरतूद दिनांक १ जानेवारी,२०१२ ते ३१ मार्च,२०१२ या कालावधीकरीता ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.२,०९,१६०/-(रुपये दोन लाख नऊ हजार एकशे साठ फक्त)आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.८७,२४,२६०/-(रुपये सत्याऐंशी लाख चोवीस हजार दोनशे साठ फक्त) अशी एकूण रु.८९,३३,४२०/-(रुपये एकोणनव्वद लाख तैतीस हजार चारशे वीस फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यास शासन खालील अटींवर मान्यता देत आहे:-



Scanned with CamScanner

अ) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
ब) व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
क) विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
ड) महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
ई) कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

२. वरील अनुदानाबाबत संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस त्वरित संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. त्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकारही त्यांना किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांस देण्यात येत आहेत.

३. या बाबींवर होणारा खर्च २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०१,अनुसूचित जातीचे कल्याण - ८०० इतर खर्च, (१०) (००) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. यांस सहाय्यक अनुदान (२२२५ २३१ ७), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु.२,०९,१६०/-(रुपये दोन लाख नऊ हजार एकशे साठ फक्त)आणि ३६ सहायक अनुदाने (वेतन) यासाठी रु.८७,२४,२६०/-(रुपये सत्याऐंशी लाख चोवीस हजार दोनशे साठ फक्त)मागणी क्रमांक एन-३ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून मासिक निधी विदरणपत्राच्या मर्यादेत भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने तसेच त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १०१/व्यय-१४, दिनांक ०३/०३/२०१२ व १०३/अर्थ-७, दिनांक १७/०३/२०१२ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कि. पां. वडते )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थसंकल्प-३), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई ३२.
अवर सचिव, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
निवड नस्ती का-महामंडळे



Scanned with CamScanner